REGISTERED No. B. 3434

**अर्थ**

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें साप्ताहिक.

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.

*वर्गणीचे दर :*

वार्षिक : ६ रु. सहामाही : ३ रु.

किरकोळ अंक : २ आ.

*जाहिरातीचे दर :*

कळविल्या व ठरविल्या अटी जाहिरातवाल्याकडून मागवाव्यात.

चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ता:-

“ अर्थ ”

“ *दुर्गाधिवास* ” पुणें ४.

# अर्थ

*“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

वर्ष १६ पुणें, बुधवार तारीख १९ एप्रिल, १९५० अंक १६


## *दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि०,*
### पुणें २.

# गूळ बंदीला सात वर्षें पूर्ण झालीं

**२६ फेब्रुवारी १९४३**

ORDER

No. 31-III

Finance Department (Supply),
Bombay Castle,
26th February 1943.

To

The Manager,
The Brihan Maharashtra Sugar Syndicate Ltd.,
Borgaon, District: Sholapur.

In exercise of the powers conferred by clause (a) of sub-rule (2) of rule 81 of the Defence of India Rules, the Government of Bombay is pleased to direct that, with effect from 27th February 1943, you shall not—
(a) use or cause to be used sugarcane whether grown by you or acquired by you from any person, for the purpose of manufacturing *gur*, and
(b) sell sugarcane grown by you to any person other than a person in charge of a sugar factory.

By order of the Governor of Bombay,
Sd./- S. G. BARVE,
Deputy Secretary to the Government of Bombay, Finance Department (Supply).

१९५१ मध्यें नवीन १००० टनांच्या माशिनरीनें २५० पोत्यांऐवजी रोज १००० पोतीं साखर तयार होऊन गेलीं सात वर्षें गूळ बंदीमुळें बुडणारें उत्पन्न पुनः सुरू होईल.

प्रत्येक शेअरची किंमत ... ... ... रु. २५
शेअर–अर्जासोबत ... ... ... रु. १०
ता. १–१०–१९५० ला कॉलचे... ... रु. १५

# मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

एक वर्ष मुदत...द. द. शें. ५ टक्के व्याज
दोन वर्षें मुदत...द. द. शें. ५॥ टक्के व्याज.
तीन वर्षें मुदत...द. द. शें. ६ टक्के व्याज.

व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

१ एप्रिल १९५०.
९८०, सदाशिव पेठ,
कॉमनवेल्थ बिल्डिंग,
लक्ष्मी रोड, पुणें २.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी.
सी. जी. आगाशे अँड को.,
मॅनेजिंग एजंटस.

पांच हॉर्स पावरचें
डिझेल एंजीन
घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.
केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें शहर.

## विविध माहिती

**लँड मार्टगेज बँकांची मागणी**—मुंबई येथें लँड मार्टगेज बँकांची परिषद् भरली होती. ह्या प्रकारच्या संस्थांचा व्याप वाढविण्यासाठी सरकारनें भरपूर मदत करावी अशी मागणी करणारा ठराव परिषदेंत मंजूर करण्यांत आला. ह्या बँकांच्या व्यवहारावर लक्ष ठेवून त्यांचें मार्गदर्शन करण्यासाठी एक स्वतंत्र डेप्युटी रजिस्ट्रार नेमण्यांत यावा, अशी मागणी दुसऱ्या एका ठरावान्वयें करण्यांत आली.

**ब्रिटिश जनतेचें आरोग्य**—ब्रिटनच्या आरोग्य खात्याचा १९४८-४९ सालाचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून ब्रिटिश जनतेचें आरोग्य सुधारल्याचें दिसून येतें. दरहजारीं मृत्युसंख्या १०८ होती. बालमृत्यूंचें प्रमाण हजारीं ३४ असें पडलें. हिंदुस्थानांत बालमृत्यूंचें दर हजारीं प्रमाण ह्याच्या तिप्पट आहे. ब्रिटिश इस्पितळांतून रोग्यांच्यासाठी ३,१५,००० खाटांची सोय करावी लागली. त्यांपैकीं २,००,००० खाटा मानसिक रुग्णांसाठी लागल्या ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

**रशिआनें आपलें जडजवाहीर सोडविलें**—३० वर्षांपूर्वी रशिआनें आपल्या मालकीचें कांहीं जडजवाहीर आयर्लंडच्या सरकारकडे २०,००० डॉलर्स घेऊन गहाण ठेवलें होतें. हें कर्ज मागणी करतांच फेडावयाचें होतें. आयरिश सरकारनें तशी मागणी केल्यामुळें रशिआनें रकम भरून गहाण सोडविलें आहे. पण ह्या मालाची किंमत आज अवघी २,००० पौंड आहे, असें तज्ज्ञांचें मत आहे.

**कारवार-हुबळी रेल्वे-रस्ता**—मार्मगोवा व कोचीन ह्यांच्या दरम्यान एक मोठें बंदर बांधण्याचा आपला विचार भारत सरकारनें तूर्त रद्द केला आहे. परंतु त्याऐवजीं कारवारपासून हुबळी अगर अळणावर पर्यंत नवा रेल्वे-रस्ता बांधण्याची शिफारस मुंबई सरकार करणार आहे. ही रेल्वे बांधल्यास शेतीच्या व कारखान्यांच्या मालाची ने-आण कितपत होईल ह्यासंबंधीं आंकडेवार माहिती गोळा करण्याचा हुकूम देण्यांत आला आहे.

**वालचंदनगर इंडस्ट्रीज लि.**—वरील कंपनीस ३० सप्टेंबर १९४९ अखेर संपलेल्या वर्षी १०,४४,४८६ रु. नफा झाला. त्यापूर्वीच्या वर्षीचा नफा ४०,०६,६०१ रु. होता. साखरेच्या किंमतींत उतार, लागवडीच्या खर्चांत वाढ, उसावरील पट्टी, कामगारांची वाढती मजुरी, डिनचर्ड स्पिरिटवरील जाचक निर्बंध, इत्यादि नफ्यांतील घटीस कारणें झालीं आहेत.

**नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें**—हीं सर्टिफिकिटें विकण्यासाठी अधिकृत एजंट पुनः नेमण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. मुंबई, मद्रास व बंगाल ह्या राज्यांत ही योजना प्रथम सुरू होईल. पांच रुपयेवाल्या सर्टिफिकेटांस २½% कमिशन मिळेल. बाकीच्या सर्टिफिकेटांस १½% कमिशनचा दर राहील.

**भारतामधील रेडिओंचें उत्पादन**—१९४९-५० सालीं भारतांत १६,८३८ रेडिओ सेट्स तयार झाले. रेडिओ तयार करणारे कारखाने एकूण आठ आहेत. त्यांपैकीं तीन मुंबईंत, एक बंगलोरला, तीन कलकत्त्याला आणि एक दिल्लींत आहे. आणखी दोन कारखाने लवकरच उत्पादन करूं लागतील. ते चालू झाल्यावर दरवर्षी १,००,००० रेडिओ सेट्सचें उत्पादन होईल. ५० रुपयाला रेडिओ देण्याचें भारत सरकारचें उद्दिष्ट आहे.

**परकीय प्रवाशांसाठी सोयी**—परकीय प्रवाशांना देशांतील कांहीं ठराविक ठिकाणें दाखविण्याची एक योजना भारत सरकार आखीत आहे. योजनेप्रमाणें रेल्वेवर परकीय प्रवाशांसाठी खास डबे ठेवण्यांत येतील. प्रवासाच्या सुखसोयींनीं युक्त असलेले डबे आता पुन्हा दुरुस्त करण्यांत येत आहेत. त्याचप्रमाणें, प्रवाशांना उपयोगी पडतील अशी माहितीचीं पुस्तकेंही पुरवण्यांत येणार आहेत.

**सयामसाठी जपानी रेल्वे एंजिनें**—ब्रिटनच्या स्पर्धेला तोंड देऊन जपाननें सयामला रेल्वे एंजिनें आणि डबे पुरविण्याचा करार केला आहे. ह्या सर्व मालाची किंमत सुमारें ४२,००,००० डॉलर्स होईल. त्याशिवाय इतर यंत्रसामुग्री आणि कापड ह्यांचाही पुरवठा जपान करणार आहे. ह्या मालाच्या बदला जपान तांदूळ घेत असल्यामुळें, आग्नेय अशिआंतील देशांना तांदुळाचा पुरवठा कमी पडत चालला आहे.

**शेतीविषयक माहिती**—बिहारमध्ये शेतीविषयीं सर्व प्रकारची माहिती मिळविण्याचें काम येत्या जुलैपासून सुरू होणार आहे. ह्या माहितींत पुढील प्रकारची माहिती प्रामुख्यानें जमविली जाईल:—शेतांची संख्या, त्यांचें क्षेत्रफळ, त्यावर करण्यांत येणारे श्रम, वापरण्यांत येणारीं हत्यारें, गुरांची संख्या, प्रमुख पिकांचें उत्पादन, इत्यादि.

**कांहीं प्रकारच्या कापडाचा तुटवडा पडणार**—भारतानें कापडाची निर्यात वाढविण्याचें ठरविल्यामुळें कांहीं प्रकारच्या कापडाचा तुटवडा पडण्याचा संभव आहे. फाळणी झाल्यापासून पाकिस्तानमधील कापूस येईनासा झाला आणि कापडाची बाजारपेठ म्हणूनही पाकिस्तान निरुपयोगी झालें. त्यामुळें चढ्या किंमती देऊन इतर देशांकडून कापूस विकत घ्यावा लागतो. अमेरिकेकडून भारतानें ५२ कोटी रुपयांचा कापूस चालू वर्षी आतापर्यंत घेतला आहे.

**हैद्राबाद संस्थानचें चलन**—हैद्राबाद संस्थानच्या चलनाऐवजीं त्या संस्थानांत भारताचें चलन एक वर्षांत सुरू करण्यांत येणार आहे. सध्या हैद्राबाद संस्थानचें ३६·३ कोटी रुपयांचें चलन व्यवहारांत आहे. सप्टेंबर १९४९ च्या शेवटीं तें ३८·५ कोटी रुपये होतें. ता. २६ जानेवारी, १९५० पासून भारताचें चलन, त्या संस्थानांत कायदेशीर धरलें जाऊं लागलें. तेव्हांपासून जवळ जवळ ३॥ कोटी रुपयांच्या चलनाचा बदला झाला आहे.

—सर्व प्रांतांतील—
सुती—गरम—रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. १९ एप्रिल, १९५०

संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक
श्रीपाद वामन काळे




## बँकांचा रिझर्व्ह फंड

### १७ व्या कलमाचा अर्थ

कांहीं मोठ्या शेड्यूल्ड बँकांच्या ताळेबंदांत दोन प्रकारचे रिझर्व्ह फंड आतां दिसूं लागले आहेतः (१) बँकिंग कंपनीज ॲक्टाच्या १७ व्या कलमाप्रमाणें काढावयाचा रिझर्व्ह फंड व (२) त्या व्यतिरिक्त काढलेला रिझर्व्ह फंड. उदाहरणार्थ, बँक ऑफ बरोडाच्या ताळेबंदांत वरील दोन प्रकारचे, अनुक्रमें ९,२५,००० रु. व १,०५,००,००० रु. असे रिझर्व्ह फंड आहेत. युनायटेड कमर्शिअल बँकेनेंहि रिझर्व्ह फंडाची अशीच फोड केली आहे. १,०५,००,००० रु. चा रिझर्व्ह फंड बरोडा बँकेनें बँकिंग कायदा अंमलांत आणण्यापूर्वी साठवलेला असून ९,२५,००० रु. चा फंड त्यानंतरचा, १७ व्या कलमाखालील, आहे. १७ व्या कलमाचा कांहीं बँका जो अर्थ लावीत आहेत, त्यास अनुसरून हें आहे; परंतु रिझर्व्ह बँकेस तो अर्थ मान्य नाहीं. रिझर्व्ह फंडाची केलेली ही फोड उद्बोधक आहे.

मार्च, १९४९ मध्यें बँकिंग कंपनीज ॲक्ट अंमलांत आला, त्यापूर्वी शेड्यूल्ड बँकांवर रिझर्व्ह फंडाबाबत कांहींहि बंधन नव्हतें. त्यांनीं रिझर्व्ह फंड काढला नसता तरी तें पूर्णपणें कायदेशीर होतें. तथापि, ह्या बँका दरसाल आपल्या नफ्यापैकीं कांहीं भाग रिझर्व्ह फंडांत हमखास टाकीत असत. आतां बँकिंग कंपनीज ॲक्टाचें १७ वें कलम सांगतें, "प्रत्येक बँकिंग कंपनीनें रिझर्व्ह फंड हा राखलाच पाहिजे; दरसालच्या निव्वळ नफ्यांतून डिव्हिडंड बाहेर करण्यापूर्वी २०% नफ्याइतकी रक्कम रिझर्व्ह फंडाकडे वर्ग केली पाहिजे; हा फंड वसूल भांडवलाच्या बरोबरीइतका होईपर्यंत अशा रीतीनें करीत गेलें पाहिजे." दरसाल रिझर्व्ह फंडांत रक्कम टाकली, म्हणजे त्या फंडांतून मागून पैसे काढण्यास प्रस्तुत कलमानें हरकत केलेली नाहीं, असा कांहीं बँकांनीं त्या कलमाचा अर्थ लावला. त्यामुळें, रिझर्व्ह बँकेस स्वतःचें मत खालीलप्रमाणें स्पष्ट करणें भाग पडलें:—

"रिझर्व्ह फंड वसूल भांडवलाच्या इतका होईपर्यंत त्यांतून रकमा काढतां येणार नाहींत. तो वसूल भांडवलापेक्षा ज्यास्त झाल्यानंतर त्यांतून रकमा काढल्यामुळें वसूल भांडवलापेक्षा तो कमी होतां कामा नये; ॲक्टाचें १७ वें कलम मार्च, १९४९ मध्यें अंमलांत आलें त्यापूर्वी जो रिझर्व्ह फंड राखलेला असेल तो १७ व्या कलमाखालीलच समजण्यांत येऊन त्या कलमांत सांगितल्याप्रमाणेंच बंदिस्त राखण्यांत यावा."

ह्याचा अर्थ असा, कीं ॲक्ट अंमलांत येण्यापूर्वी बँकांनीं जो रिझर्व्ह फंड निर्माण केला, त्याची रक्कम वसूल भांडवलापेक्षा ज्यास्त नसल्यास, त्या फंडास बँकांना कोणत्याहि कारणासाठीं हात लावतां येणार नाहीं. बँक लिक्विडेशनमध्यें गेली, तरच तो फंड उपयोगास येणार; परंतु बँक चालू ठेवण्यासाठीं त्याचा विनियोग करतां येणार नाहीं. एखाद्या वर्षी एखाद्या बँकेस बुडीत कर्जामुळें किंवा इन्व्हेस्टमेंटमधील तुटीमुळें नुकसान आलें आणि नफ्यांतून तें भागवितां येण्याजोगें नसेल, तर तिच्याजवळ प्रचंड रिझर्व्ह फंड असूनहि तो तसाच कायम ठेवून दुसऱ्या बाजूस तोटा दाखवावा लागेल. हें नुकसान भरून येईपर्यंत ताळेबंदांत असेच आकडे दिसत राहातील.

रिझर्व्ह बँकेचें मत वरीलप्रमाणें असलें, तरी कायदेशीर सल्ला सांगतो, कीं १७ व्या कलमांतील रिझर्व्ह फंड व त्यावरील बंधनें ह्यांचा, कायदा अंमलांत येण्यापूर्वीच्या रिझर्व्ह फंडाशीं कांहींहि संबंध नाहीं. १७ व्या कलमाखालील रिझर्व्ह फंड बँकेनें कायदा अंमलांत आल्यापासून निर्माण करून राखला पाहिजे; त्याखेरीजच्या इतर रिझर्व्ह फंडाशीं १७ व्या कलमाचा कांहींहि संबंध नाहीं. १९४९ च्या कायद्यानें बँकांसाठीं ताळेबंदाचा जो नमुना दिला आहे, त्यांत एक फुटनोट (बी २) आहे, ती अशी:— "कायद्याच्या १७ व्या कलमान्वयें राखलेला रिझर्व्ह फंड स्वतंत्र दाखवावा." ह्याचा अर्थ, कायद्यानें अनेक प्रकारच्या रिझर्व्ह फंडांची शक्यता गृहीत धरलेली आहे; १७ व्या कलमाखालील एक रिझर्व्ह फंड आणि त्या खेरीज आणखी काढलेले रिझर्व्ह फंड. बँकांनीं रिझर्व्ह फंड निर्माण करून ते वाढवावेत, त्यांस शक्यतों हात लावण्यांत येऊं नये, हें खरें असलें तरी त्यासहि कांहीं सीमा आहे. लिक्विडेशनमध्यें गेल्यावरच रिझर्व्ह फंडाचा उपयोग व्हावा, हें जरा चमत्कारिक दिसतें. ह्यासंबंधांतील स्पष्टीकरण लवकर झालेलें बरें. एखाद्यानें विमा उतरला असला आणि त्याची रक्कम त्याच्या मृत्यूनंतरच मिळावयाची असली, परंतु त्याच्या आजारपणांत जरूरीचे वेळींहि त्या विम्याचा त्याला कांहीं उपयोग झाला नाहीं आणि त्यामुळें त्यास मृत्यु आला, तर कुटुंबाचें हित साधलें असें होईल काय? बँकेच्या अडचणीच्या वेळींहि तिला रिझर्व्ह फंडास यत्किंचितहि हात लावतां आला नाहीं आणि त्यामुळें बँकेवर संकट ओढवलें, तर ठेवीदारांचें हित होईल काय? रिझर्व्ह फंडाचा मुख्य हेतु लक्षांत घेऊनहि, त्यांत थोडातरी लवचीकपणा असावा हें बँकांच्या व त्यांच्या ठेवीदारांच्या हितासाठींच ठरेल. मूळ उद्देश आणि कलमाचा लावावयाचा अर्थ, ह्यांत एकवाक्यता हवी.

---

### अमेरिकेंतील चहाच्या खपांत ५० टक्के वाढ होणार?

पुढच्या पांच वर्षांत अमेरिकन लोक आजच्यापेक्षा ५० टक्क्यांनीं अधिक चहा पिऊं लागणार असें मार्केट टी ब्यूरोचे जाहिरातप्रमुख (डायरेक्टर ऑफ ॲडव्हरटायझिंग) जेम्स जे. बय यांनीं केलें आहे.

---

### सेकंदाच्या दशकोट्यांशापर्यंत वेळेचें मोजमाप

दशकोट्यांश सेकंदापर्यंत वेळेचें मोजमाप करण्याचा मार्ग अमेरिकेंतील शास्त्रज्ञांनीं संशोधिला आहे. एक तास म्हणजे अनंत काळ वाटावा व डोळ्याची पापणी लवण्यास लागणारा काळ म्हणजे संबंध आयुष्य वाटावें इतक्या सूक्ष्मांशापर्यंतचें वेळेचें मोजमाप हें अणुकणांच्या अभ्यासाचे दृष्टीनें अतिशय महत्त्वाचें आहे, असें म्हणतात.

### दि त्रावणकोर ओगले ग्लास मॅन्युफॅक्चरिंग कं. लि, मंजुमेल

ओगले बंधु लि.च्या व्यवस्थेखालील वरील कंपनीनें ३१ डिसेंबर, १९४९ अखेर संपलेल्या वर्षी ५,००,००० रुपयांपेक्षा जास्त किंमतीचें उत्पादन केलें, तें पूर्वीच्या वर्षापेक्षा ५०,००० रुपयांनीं अधिक आहे. सर्व ओव्हरहेड खर्च भागवून आणि सुमारें २०,००० रुपये घसारा काढून कंपनीस ४,२११ रु. नफा उरला. त्यांत शिल्की नफा मिळवला म्हणजे होणारे ५,२०८ रु. पुढील हिशेबांत ओढण्यांत येणार आहेत. उत्पादन वाढलें तरी फारसा नफा उरण्याइतकी कूस राहिली नाहीं; तथापि गेल्या वर्षापेक्षा अहवालाचे वर्षी सर्वच दृष्टींनीं बरीच प्रगति झालेली आहे. कंपनीच्या मालास मागणी हळू हळू वाढत असल्यानें १९५० चें वर्ष अधिक चांगलें जाण्याची चिन्हें आहेत, त्यासंबंधांत कंपनीचे कसून प्रयत्न चालू आहेत. चांगल्या आणि किंमतवान मालाचें मोठें उत्पादन काढण्याकडे तिचें विशेष लक्ष रहाणार आहे.

---

### दि कमर्शिअल बँक लि, कोल्हापूर

वरील बँकेनें १९४९ सालीं १,८६,६७० रु. वसूल भांडवल, १,४८,१८५ रु. रिझर्व्ह आणि इतर फंड, ३१,५७,०८८ रु. ठेवी, अशा ३६ लक्ष रुपयांच्या खेळत्या भांडवलावर ५०,२३० रु. नफा मिळविला. ९,२३,६१५ रु. कॅश, ४,१९,८२८ रु. बिल्स, ४,०७,८३९ रु. इनव्हेस्टमेंट, १७,१२,५८६ रु. कर्जे, ९८,८५० रु. इमारत, इत्यादि जिंदगीच्या बाजूचे प्रमुख आकडे आहेत. बँकेनें रिझर्व्ह फंडांत १०,००० रु., बॅड डेट फंडांत ५,००० रु., इनव्हेस्टमेंट फ्लक्चुएशन फंडांत २,००० रु. अशा रकमा टाकून व १२,००० रुपयांची करासाठी तरतूद करून ६% करमाफ डिव्हिडंड देण्याकडे ११,०९८ रुपयांचा विनियोग केला आहे. अशा रीतीनें बँकेची मजबुती वाढवून डिव्हिडंडचा दरहि चांगला राखला आहे. बँकेच्या (१) पापाची तिकटी, (२) इचलकरंजी व (३) हुपरी अशा तीन शाखा आहेत. (चेअरमन : श्री. बापुराव तुकाराम देवरुखकर बी. ए., एलएल. बी. मॅनेजिंग डायरेक्टर : श्री. गणपतराव लक्ष्मणराव साळोखे. अकौंटंट : श्री. बी. डी. मगदुम.)

---

### दि बँक ऑफ सिटिझन्स लि. बेळगांव

वरील बँकेच्या हिशेबाचें मूळ वर्ष ३० जून अखेरीचें होतें तें ३१ डिसेंबर अखेरीचें करणें बँकिंग कंपनीज कायद्यानें आवश्यक झाल्यामुळें आतां डिसेंबर १९४९ अखेरचा ताळेबंद तयार करण्यांत आला आहे. ह्या ताळेबंदाप्रमाणें बँकेचें वसूल भांडवल ३,४८,३१० रु. असून रिझर्व्ह व इतर फंड १,००,७९० रुपयांचे आहेत. ठेवींची रक्कम २४,५४,२३९ रु. आहे. कॅश ५,६३,४३२ रुपये, इनव्हेस्टमेंटस १०,६२,६२३ रुपये, कर्जे १८,८२,२६७ रुपये असे जिंदगीचे प्रमुख आकडे आहेत. एकूण ताळेबंद ३९,४४,५४३ रुपयांचा आहे. बँकेची वार्षिक सभा २६ मार्च, १९५० रोजीं झाली. (चेअरमनः श्री. ए. पं. बंदुकवाला. जनरल मॅनेजरः श्री. व्ही. एम. पाटकर. चीफ अकौंटंटः श्री. एन. एम. सुखटणकर.)

---

**भारतांतील रहाणीचा खर्च**—आंतरराष्ट्रीय मजूर कचेरीनें निरनिराळ्या ३४ देशांतील रहाणीच्या खर्चाची चौकशी केली. चौकशींत असें आढळून आलें कीं, ३३ देशांतील निर्देशांक १९४९ सालीं वाढला आहे. मुंबईत मात्र हा निर्देशांक ५·५ टक्क्यांनीं कमी झाला आहे.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)

पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) ||| श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. | ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. | ३,९८,२८५ |

**एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. मा. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया, लि.

हेड ऑफिस : १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई

एकूण खेळतें भांडवल : ३,६०,००,००० रु. वर

वसूल भांडवल, रिझर्व्ह व इतर फंड : ११,००,००० रु. वर

★ बँक स्ट्रीटवर ★

३,१७,००० रुपयांची बँकेची स्वतःची इमारत

स्थानिक शाखा : १ दादर, २ गिरगांव, ३ मिंटरोड, ४ जव्हेरी बाजार, ५ माटुंगा, ६ शीव, ७ विलेपार्ले.

इतर शाखा : ८ अहमदाबाद, ९ अहमदनगर, १० अकोला, ११ अमरावती, १२ बडनेरा, १३ बेळगांव, १४ चांदा, १५ कहाक टाऊन (सी. पी.), १६ दिल्ली, १७ देवळाली, १८ धुळें, १९ गुरगांव (पंजाब), २० इचलकरंजी, २१ जळगांव, २२ कारंजा, २३ कोल्हापूर, २४ कोपरगांव, २५ लोणंद, २६ महाड, २७ मालेगांव, २८ मिरज, २९ मूर्तिजापूर, ३० नागपूर शहर, ३१ नंदुरबार, ३२ नाशिक शहर, ३३ नाशिक रोड, ३४ पंढरपूर, ३५ पहाडगंज, ३६ पेण, ३७ पुणें शहर, ३८ पिंपळगांव, ३९ संगमनेर, ४० सांगली, ४१ शाहुपुरी, ४२ सिन्नर, ४३ सितार्बर्डी, ४४ यवतमाळ, ४५ शिवाजी नगर (पुणें), ४६ शहापूर (बेळगांव), ४७ नामपूर (नाशिक).

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

भागीदारांची संख्या २,२०० वर. ठेवीदारांची संख्या ५०,००० वर.

डी. एन. गांडेकर, बी. ए., एलएल. बी., मॅनेजर, पुणें शाखा. (बुधवार चौक)

डी. डी. देशपांडे, बी. ए. मॅनेजिंग डायरेक्टर.

## जपानची स्पर्धा पुनः सुरू होणार !

पश्चिम युरोपांत उदयास आलेलें औद्योगिक उत्पादनाचें तंत्र पूर्वेकडील देशांपैकीं जपाननें प्रथम आत्मसात केलें. तेव्हांपासूनच जपानच्या स्पर्धेचा उगम झाला. ही स्पर्धा प्रत्यक्ष जाणविली ती मात्र १९२० ते ३० च्या काळांत; कारण पहिल्या महायुद्धाचा फायदा घेऊन जपाननें आपले उद्योगधंदे वाढविले होते. १९४१ सालपर्यंत पश्चिम युरोपांतील उद्योगप्रधान राष्ट्रांना जपानी मालाची स्पर्धा जागतिक बाजारपेठेंत कमी-अधिक प्रमाणांत जाणवत होती. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत मात्र जपानी माल बाजार पेठांतून येईनासा झाला. परंतु आतां पुन्हां जपानच्या मालाची स्पर्धा सुरू होणार अशी लक्षणें दिसत आहेत.

जपानच्या परदेशीय व्यापारांत रेशीम आणि रेशमी वस्त्रें ह्यांना फार महत्त्वाचें स्थान होतें. कच्चें रेशीम परदेशीं पाठवूनच आयातीसाठीं लागणारी हुंडणावळ जपाननें मुख्यतः मिळविलेली आहे. असें असलें तरी, रेशमाची निर्यात ज्या इतर देशांतून रेशमाची निर्मिती करण्यांत येते त्यांनाच जाणवते. हिंदुस्थानांत देशी रेशमाचा धंदा जपानच्या रेशमाशीं स्पर्धा करूं शकत नाहीं हें कांहीं गुपित नाहीं. रेशमाशिवाय कापसाचें व कृत्रिम रेशमाचें कापड ह्यांची निर्यातही जपान करतें. दुसऱ्या महायुद्धापूर्वी बऱ्याच बाजारपेठांचा कबजा जपानी कापडानें घेतलेला होता. जपानी कापड दर्जाच्या दृष्टीनें कमी प्रतीचें असलें तरी त्याची किंमत गिऱ्हाइकाला परवडणारी असते. ज्या देशांतून गिऱ्हाइकांचें उत्पन्न बेताचें असतें अशा देशांतून कमी किंमत हीच बाजार पेठ मिळविण्यास प्रभावी ठरते. १९३१ सालानंतर जपाननें मांच्युरिआ, कँटन, कोरिआ इत्यादी देशांच्या बाजारपेठा मिळविल्या; म्हणजे पाश्चिमात्य राष्ट्रांप्रमाणें जपाननेंही आपल्या मालासाठीं राखीव बाजारपेठांची सोय केली.

तरी पण जपानच्या स्पर्धेचें मूळ वरील परिस्थितींतच केवळ सांपडते असें नाहीं. जपानची लोकसंख्या सुमारें ७॥ कोटी आहे. हे सर्व लोक अतिशय उद्योगी आणि साध्या रहाणीनें जगणारे आहेत. जपानच्या गिरणी कामगाराला दर महिना ४० ते ८० शिलिंग पगार मिळतो. पोरसवदा कामगारांचा समावेश जर कामगारवर्गांत केला तर जपानी मजुराचा पगार सरासरी ६० शिलिंगापेक्षांही कमी पडेल. गिरण्यांत दोन पाळ्या चालतात महिन्यांतून ४ दिवस सुटी असते; परंतु रविवारीं सुद्धा गिरण्या चालू असतात. सर्व वर्षभराचा विचार केला तर जपानी गिरण्या ४,९९२ तास चालू असतात. ब्रिटिश कापडाच्या गिरण्या २,२१० तास चालू असतात. ह्याचा अर्थ असा होतो कीं ब्रिटिश कापडाच्या गिरण्या दोन वर्षांत जितकें काम करतात, त्यापेक्षा जास्त काम जपानी गिरण्या एक वर्षांत करतात. दुसऱ्या महायुद्धांत जपानची उत्पादनक्षमता बरीच कमी झाली होती. पण आतां पुन्हां उत्पादन वाढूं लागलें आहे. आशिआ खंडांत हें सर्व उत्पादन खपण्याचा संभव आज तरी नाहीं हा भाग वेगळा. १९४८ सालीं जपाननें इंडोनेशिआला ३.७९ कोटी डॉलर्स किंमतीचें कापड पुरविण्याचा करार केला. इतका मोठा सवदा एकदम केल्याचें उदाहरण क्वचितच सांपडतें. इंडोनेशिआशिवाय चीन, फिलिपाइन्स, अमेरिका, ब्रिटन, भारत, पाकिस्तान, ऑस्ट्रेलिआ, आफ्रिका, दक्षिण अमेरिका इत्यादि अनेक देशांत जपाननें कापड निर्यात केलें आहे. आतां कापडाच्या बाजारपेठांत जपानशीं स्पर्धा करण्याचा प्रसंग ब्रिटनसारख्या देशांपुढें उभा राहिला आहे.

कापडाच्या बाजारपेठेंतच नव्हे तर इतर मालाच्या बाजारपेठेंतूनहि जपानी मालाची स्पर्धा सुरू होणार आहे असें दिसतें. चिनीमातीची भांडीं, कांचेचा माल, रसायनें, सिमेंट, साबण, काड्यांच्या पेट्या, वनस्पती पासून बनविलेलीं तेलें, माशांचीं तेलें, इत्यादी मालही जपान निर्यात करूं लागणार आहे. कापडाच्या धंद्यांत जशी परिस्थिती आहे तशीच ह्या इतर धंद्यांतूनही आहे. थोडक्यांत, म्हणजे जपानी मालाच्या उत्पादनाचा खर्च इतर देशांच्या मालाच्या उत्पादनाच्या खर्चापेक्षा कमी असतो. त्यामुळें त्या मालाच्या किंमती कमी असतात; आणि कमी किंमतीचें आकर्षण कोणत्या देशांतील ग्राहकाला भूल पाडणार नाहीं !

---

**जपानमध्यें हिंदी बँक**—भारतांतील बँक ऑफ इंडिआ, ह्या बँकेला जपानमध्ये आपली शाखा उघडण्यास परवानगी देण्यांत आली आहे. टोकिओंत उघडली जाणारी ही पहिलीच हिंदी बँक आहे. जपानमध्यें युद्धोत्तर काळांत धंदा सुरू करणारी ही १२ वी परदेशी बँक आहे.

**कापसासाठी स्वतंत्र खातें**—रशिआंत मध्यआशिआ, जॉर्जिआ, युक्रेन आणि मोल्डाव्हिआ या भागांत कापूस पिकतो. ह्या उपराज्यांतील कापसाची लागवड अधिक त्वरेनें व्हावी म्हणून रशिअन सरकारनें कापसासाठीं एक स्वतंत्र खातेंच उघडलें आहे.

**नव्या चीनचे औद्योगिक तळ**—चीनच्या कम्युनिस्ट सरकारनें आपले उद्योगधंदे मांच्युरिआ आणि सिकिअँग ह्या प्रांतांत वसविण्याचें ठरविलें आहे. सिकिअँग प्रांत काश्मीरला लागून आहे. ह्यापूर्वी चीनचा औद्योगिक विकास समुद्र किनाऱ्यावरील बंदरांच्या आसपासच झालेला होता.

**जपानमध्यें हिंदी विमा कंपनी**—मुंबईमधील न्यू इंडिआ अश्युरन्स कंपनीनें भारत सरकारच्या साह्यानें मरीन इन्शुरन्सचा धंदा जपानमध्यें मिळविला आहे. सयाममधून जपानला जाणाऱ्या २२५ कोटी डॉलर्स किंमतीच्या तांदुळाच्या वहातुकीचा विमा आणि ब्रह्मदेशांतून जपानला जाणाऱ्या तांदुळाचा विमा वरील कंपनीनें स्वीकारला आहे. पहिल्या व्यवहारांत कंपनीला १,२०,००० डॉलर्स आणि दुसऱ्या व्यवहारांत ७०,००० डॉलर्स मिळाले.

**श्री. अण्णासाहेब चिरमुले ह्यांचा सत्कार**—सातारा स्वदेशी कमर्शिअल कंपनी लि. ( बँक ) सातारा ह्या कंपनीचे आद्य संस्थापक व तिच्या संचालक मंडळाचे सुरुवातीपासूनचे अध्यक्ष श्री. वा. ग. तथा अण्णासाहेब चिरमुले हे संचालक मंडळांतून सप्टेंबर १९४९ पासून निवृत्त झाले आहेत. त्यांनीं कंपनीची निरलस व निस्वार्थी बुद्धीनें जी अमोल सेवा केली, त्याबद्दल त्यांचा सत्कार ना. श्री. वैकुंठराय मेहता, अर्थमंत्री, मुंबई प्रांत, यांचे हस्तें शनिवार ता. २२-४-५० रोजीं सायंकाळीं साडेपांच वाजतां सातारा येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या इमारतींत बोर्ड ऑफ डायरेक्टर्सतर्फे करण्यांत येणार आहे.

**" विमको "**—वेस्टर्न इंडिया मॅच कं. लि. नें १९४९ मध्यें ११,२२,३९,११० रुपयांची विक्री केली. ठोक नफा १ कोटी, १२ लक्ष रुपये होऊन निव्वळ नफा ५५ लक्ष, ७९ हजार रुपये झाला. ११% करमाफ डिव्हिडंड वांटण्यांत येईल.

### रुबलचा नवा गट

गेल्या कांहीं दिवसांत रशिआच्या रुबलविषयीं निरनिराळ्या प्रकारच्या वार्ता प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांपैकीं कांहीं रुबलच्या अंतर्गत किंमतीसंबंधीं आहेत, तर कांहीं रुबलच्या आंतरराष्ट्रीय स्थानासंबंधीं आहेत. रशियानें ग्राहकांना लागणाऱ्या वस्तूंच्या किंमती शेंकडा १० ते ३० टक्क्यांनीं उतरविल्या आहेत. परकीय वकिलातींना त्यांच्या चलनाच्या बदला देण्यांत येणाऱ्या रुबल्सचा दर कमी केला आहे; आणि रुबलचा डॉलर्सशी असणारा संबंध तोडून तो सोन्याशीं जोडला आहे. ह्या सर्व घटना निरनिराळ्या वाटल्या तरी अर्थपूर्ण आहेत. रशिआच्या कक्षेतील इतर राष्ट्रांचा चलनें रुबलवर आधारून रुबलचा एक नवा गटच स्थापन करण्याचा रशिआचा विचार आहे असा ह्या सर्व घटनांचा अर्थ लावण्यांत येत आहे. ह्या गटांत खुद्द रशिआ, चेकोस्लोव्हाकिआ, चीन, पोलंड, रुमेनिआ, हंगेरी, बल्गेरिआ, अलबानिया, मोंगोलिया, उत्तर कोरिआ आणि कदाचित् व्हिएट मिन्ह ह्या राष्ट्रांचा समावेश होईल. ह्या देशांतील व्यापाराची सोय व्हावी म्हणून मास्को व पेकिंग येथें एक 'क्लिअरिंग बँक' स्थापन करण्यांत येईल असा अंदाज आहे. ह्या सर्व घडामोडींत पोलंडनें पुढाकार घेतला होता. आपल्या व्यापारासंबंधाचे आकडे पोलंडनेंच प्रथम रुबल्सच्या किंमतींत व्यक्त केले होते. रशिआची उत्पादनक्षमता सर्वांत अधिक असल्यानें रशिआच्या कक्षेतील राष्ट्रांत रुबलला "आंतरराष्ट्रीय" महत्त्व प्राप्त होणें अपरिहार्यच होतें. तथापि ह्या गटाच्या बाहेर असणाऱ्या जगांतील इतर राष्ट्रांशीं व्यापार करतांना रुबलच्या नव्या स्थानामुळें फारसा फरक होणार नाहीं. कारण, रुबल हा डॉलरप्रमाणें व्यापाराच्या मामुली पद्धतीनें मिळूं शकत नाहीं.

---

**महाराष्ट्रांतील साखरेचें उत्पादन**—महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांचें साखरेचें उत्पादन १९४८–४९ मध्यें झालें, तेवढें १९४९–५० मध्यें होणार नाहीं, असा अंदाज आहे. गेल्या वर्षीचें उत्पादन १,११,९२९ टन होतें; चालू वर्षी तें १,०६,४३० टनच होईल, अशी अपेक्षा आहे. बेलापूर कंपनीचें चालू वर्षाचें अपेक्षित उत्पादन १४,३०२ टन आहे; गेल्या वर्षीचा आकडा १२,८८८ टन आहे. इतर कांहीं कंपन्याचे आकडे खालीलप्रमाणें आहेत. कंसांतील आकडा गेल्या वर्षीच्या उत्पादनाचा आहे.

| | |
|---|---|
| महाराष्ट्र शुगर मिल्स | १२,५०० ( १४,५२५ ) |
| रावळगांव शुगर मिल्स | ८,२४९ ( ८,०५३ ) |
| वालचंदनगर इंडस्ट्रीज | १६,११२ ( १५,२८७ ) |
| फलटण शुगर वर्क्स | १०,०६५ ( १०,८३४ ) |

**कॉलचे पैसे वसूल करण्यास तात्पुरती बंदी**—ज्या ऑर्डिनन्सखालीं मुंबई सरकारनें सोलापूर मिल ताब्यांत घेतली, तो ऑर्डिनन्स बेकायदा असल्यानें मिलला प्रेफरन्स भागांवरील कॉलचे पैसे वसूल करण्याची बंदी करण्यांत यावी, असा अर्ज द्वारकादास श्रीनिवास ह्यांनीं मुंबई हायकोर्टाकडे केला. अर्जदाराचे ३,२४४ शेअर्स असून त्याला १,८२,२०० रु. कॉलमनी भरण्यास कंपनीनें सांगितलें आहे. १ मे पूर्वी अर्जदारानें सॉलिसिटरांकडे ही रक्कम डिपॉझिट ठेवावी ह्या अटीवर हायकोर्टानें इंटेरिम इंजंक्शन दिलें. अर्जाची सुनावणी २६ जून, १९५० रोजीं होईल.

**दख्खनची दौलत**—हें प्रदर्शन ३० एप्रिल रोजीं उघडण्यांत येण्याचें आतां निश्चित झालें आहे. उद्घाटन समारंभासाठी नॅशनल प्लॅनिंग कमिशनचे, डे. चेअरमन श्री. नंदा हे येणार आहेत.


स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१–१२–४८ अखेर

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. १,३१,००० |
| ठेवी | रु. ७१,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८१,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :


| १ वर्ष | दोन वर्षे | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. १–८–० | रु. १–१२–० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १–०–० |
| चालू डिपॉझिट | " | ०–८–० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल्. बी., चेअरमन

बेडेकर
लोणच्याचा
तयार मसाला





हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.